पोलीस उप आयुक्त,
सायबर गुन्हे,
पहिला मजला, बीकेसी पोलीस ठाणे,
बी.के.सी., बांद्रा(पुर्व), मुंबई. ४०००५१
दुरध्वनी क्रमांक – (०२२)२६५२९९२६
ई मेल – dcpcybercrime.mum@mahapolice.gov.in

## मध्य विभाग सायबर पोलीस ठाणे, वरळी, मुंबई यांनी केलेल्या जलद कारवाईमुळे निराश तरूणाचे प्राण वाचवण्यात यश

मध्य विभाग सायबर पोलीस ठाणे, वरळी, मुंबइ यांनी केलेल्या जलद कारवाईमुळे पोलीसांना निराश तरूणाचे प्राण वाचवण्यात यश

| | |
|---|---|
| कक्ष | सायबर |
| पोलीस ठाणे | मध्य विभाग सायबर पोलीस ठाणे , वरळी, मुंबई |
| थोडक्यात माहिती | एका इसमाने दिनांक ३१/०७/२१ रोजी मुंबई पोलीसांना व इतरांना व्टिट्रव्दारे कळविले कि, प्लीज त्याचा जीव वाचवा. व समोरील व्यक्ती ही मानसिक त्रासात असुन व्हॉट्सअ‍ॅप चॅटमध्ये जीव देण्याची धमकी देत असल्याचा मजकुर होता. |
| घटना घडली दिनांक वेळ व ठिकाण | इंटरनेटच्या माध्यमातून दिनांक :–३१/०७/२१ रोजी पहाटे ०६:३० मिनीटांनी |
| घटनेची माहिती कशी मिळाली | मुंबई पोलीस व्टिटर सेल यांचे कडून |

थोडक्यात प्रेस नोट :– आज दि ३१/०७/२०२१ रोजी पहाटे ६.३० श्री रिज्जु रत्नाकर ३०वर्षे हा मूळचा राहणार केरळा शिक्षण डिप्लोमा इन टूल अंड डिझाईन यांनी डिप्रेशनमध्ये घेऊन आत्महत्या करीत असल्याबाबतचा मेसेज गौतम मेंगळे पत्रकार यांनी व्टिट्रवर आत्महत्येबाबत टाकलेला मेसेज व्हॉट्सअ‍ॅप व्दारे मध्य प्रादेशिक सायबर विभाग यांना प्राप्त झाला. या बाबत तात्काळ मध्य नियंत्रण कक्षास कळविले तसेच पोलीस मा. उप आयुक्त रश्मी करंदीकर यांनाही कळविले

तांत्रिक तपासानंतर तो होटेल अरोमा दादर ईस्ट याठिकाणी असल्याचे

समजून आले. तात्काळ सदर ठिकाणी पोहचुन त्या रूमचा दरवाजा हॉटेल चे मॅनेजर सचिन पेडणेकर, पो नि संजय गोविलकर, पोउनि निलेश हेंबाडे यांच्या मदतीने सावधपणे डुप्लिकेट चावीने उघडून प्रवेश केला त्याचे कडील चाकू सह ताब्यात घेऊन त्यास  जाऊन धीर देऊन आत्महत्या करण्यापासून रोखण्यासाठी त्याचे मनपरिवर्तन केले.

त्याबाबत माहिती घेतली असता त्याने कळवले की तो दिनांक 30/7/21 रोजी रात्री ११ वाजता  हॉटेल अरोमा, दादर—ईस्ट मध्ये राहण्यासाठी आलेला होता. त्याचे  एका मुली सोबत प्रेम संबंध होते ते दोघे लग्न करणार होते परंतु तीने अचानक लग्नास नकार दिला त्यामुळे सदर इसमास डिप्रेशन मध्ये आले होते. या बाबत भोईवाडा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुशील गायकवाड यांना कळविण्यात आले. ते तात्काळ घटनास्थळी आले त्यास ताब्यात दिले असून त्याचे मानसोपचार तज्ज्ञांकडून समुपदेशन करून त्याच्या नातेवाईकांना बोलविण्यास सांगितले आहे.